# सृष्टिज्ञान : ५० वर्षांपूर्वी

## (नोव्हेंबर १९७३, वर्ष ४६वे, अंक ११, क्रमांक ५५१)

या अंकात संपादकीयासह १० लेख आहेत. डॉ. वा. ग देशपांडे यांनी महाराष्ट्रातील भूजल समस्या या त्यांच्या अभ्यासपूर्ण लेखात भूपृष्ठावर साठवलेले पाणी, पावसाचे पाणी, आणि भूमिगत पाण्याचे साठे यावरच आपले जीवन कसे अवलंबून आहे, आणि त्याचे काटेकोर नियोजन करणे अत्यावश्यक आहे याविषयी माहिती दिली आहे. पाण्याचे वयही मोजता येते असे त्यांनी सांगितले. मृत्तीका, मृत्तिकास्नान वगैरे या श्री बाबर यांच्या लेखांमध्ये त्यांनी मृत्तिकेचे म्हणजेच मातीचा आरोग्या साठी उपयोग, याविषयी माहिती दिली आहे. पोटशूळ, मलबद्धता ,नेत्र रोग, वगैरे आजारांमध्ये मातीचा उपयोग होतो असा अनुभव आहे. प्रचंड शक्तीचा मूलस्त्रोत या श्री मधुकर फडकें नी लिहिलेल्या लेखांमध्ये पृथ्वीवरच्या सर्व शक्तींचा मूलस्त्रोत सूर्य आहे आणि सूर्यावर होणाऱ्या अणुगर्भीय बदलांमुळे प्रत्येक क्षणी हायड्रोजन पासून हेलियम बनत असतो व त्यामुळे ही शक्ती निर्माण होते. श्री. व्ही. सी. नेरकर यांनी लिहिलेल्या शुद्ध व निर्मळ दुधाचे उत्पादन या लेखात शुद्ध दूध कसे मिळू शकेल याविषयी माहिती आहे. त्यासाठी जनावरांचे निरोगी असणे, दूध काढणारा निरोगी असणे, दूध काढल्या जाणाऱ्या जागेची स्वच्छता असणे, वापरलेल्या जाणाऱ्या भांड्यांची स्वच्छता, आणि शेवटी दुधाची साठवण कशी निरोगी आणि जंतू विरहित असावी याविषयी सविस्तर माहिती दिली आहे. मानाचा मुजरा या सदरात श्री. प्रभाकर सोवनी यांच्या लेखांमध्ये चार शास्त्रज्ञांची माहिती आहे. जगदीश चंद्र बोस व त्यांनी केलेले वनस्पती विषयी आणि रेडिओ व बिनतारी विद्युत लहरी वहन याविषयी माहिती आहे. चंद्रशेखर व्यंकट रमण म्हणजेच सी. व्ही. रामन यांना त्यांच्या किरणांच्या विकिरणा बद्दलच्या संशोधनासाठी– रामान इफेक्ट–१९३० साली नोबेल पारितोषिक मिळाले. जेम्स क्लार्क मॅक्सवेल आणि त्यांनी केलेल्या विद्युत चुंबकीय शास्त्रातील संशोधनाबद्दल माहिती आहे.मेरी क्युरी ह्या दोनदा नोबल पारितोषक मिळालेल्या स्त्री शास्त्रज्ञां नी रेडियम ह्या मूलभूत किरणोत्सारी मुलतत्वाचा शोध लावला. कोहूटेक धूमकेतू हा लेखात श्री. मो. ना. गोखले यांनी डिसेंबर मध्ये दिसणाऱ्या या नवीनच शोध लागलेल्या धूमकेतूची माहिती नोव्हेंबर अंकातच दिली होती. डॉ.प्रभाकर जामखेडकर यांच्या अश्वांची उत्क्रांती ह्या लेखात, अश्वांच्या जाती, उपजाती आणि त्यांची ४५ कोटी वर्षांपासूनची झालेली उत्क्रांतीची माहिती आहे. विज्ञान वार्ता या सदरामध्ये श्री. अ. ना. ठाकूर यांनी ४५ कोटी वर्षांचे डोळे या सदरात ट्रायबोलाईट नावाच्या प्राण्यांचे डोळे हे कॅल्साइट या खनिजांचे बनलेले असतात, या संशोधनाविषयी माहिती दिली वेदनामुक्त गोळ्यांचा अतिरेक टाळा या लेखात श्री. वि.गो भागवतांनी वेदनामुक्त गोळ्यांच्या अति वापरामुळेमुळे आरोग्यावर, मूत्राशयाच्या कार्यात अडथळे निर्माण होणे,असे कांही दुष्परिणाम होऊ शकतात असे सांगितले. सिंहगडची पुनर्भेट या लेखात पुण्याजवळ असलेल्या सिंहगड किल्ल्यावर पुणे चित्रवाणी ची कशी स्थापना झाली आणि त्याचा कसा उपयोग होईल याविषयी माहिती दिली आहे. गणेशपत्री या प्रा.य.बा. राजे यांनी लिहिलेल्या पुस्तकाचा प्रा.भा.वा.केळकर यांनी परिचय करून दिला आहे. गणेशाला प्रिय औषधी वनस्पती, म्हणजे माका, विष्णुक्रांता अशा पत्रीं विषयी माहिती आहे. ◆

**अशोक तातुगडे**
मोबा. ७०५७५४५७६९